प्रिय अजित/वसुधा, स.न.,
या चर्चासत्रास तुम्ही दोघांनी उपस्थित राहून चर्चेत सहभागी व्हावे ही विनंती. तसेच अन्य कार्यकर्त्यांची नोंद घ्यावीत/त्यांना सांगावे.
आ, [signature]

6/5/93

समाज विज्ञान अकादमी
अक्षय, २१६, नारायण पेठ, पुणे - ४११ ०३०.

## चर्चाशिबिर

## समान नागरी कायद्याचा प्रश्न

( गुरुवार, ६ मे, १९९३ )

हिंदुत्ववादी शक्तींनी स्वत:चे राजकारण पुढे रेटण्यासाठी जे वेगवेगळे मुद्दे उपस्थित केले आहेत त्यामध्ये समान नागरी कायद्याच्या ताबडतोब अंमलबजावणीवर भर दिला आहे. हा कायदा प्रत्यक्षात आणण्याचे आजवरच्या सरकारांचे अपयश हे मुस्लिम अनुनयाचे स्पष्ट उदाहरण आहे आणि हाच प्रश्न आज राष्ट्रीय एकात्मतेच्या आड येत आहे असा दावा ते करत असतात. समान नागरी कायद्याचा नेमका आशय काय हेही त्यांनी आजवर स्पष्ट केलेले नाही. एवढेच काय पण देशातील नव्वद टक्के नागरी कायदे हे सर्वांना समानच आहेत याचीसुध्दा त्यांना कल्पना नाही, किंवा त्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करून ते राजकारण करत आहेत की काय अशी शंका येते.

उलट, आज समान नागरी कायद्याबद्दल बोलल्यास मुस्लिम व इतर अल्पसंख्याक गटातील धर्मवादी शक्ती त्यांचा धर्म धोक्यात आल्याचे काहूर उठवतील आणि ती जनता आपल्यापासून दूर जाईल की काय, पण त्याचवेळी, या प्रश्नाबद्दल आपण मूक राहिल्यास सर्वसामान्य हिंदू जनता हिंदू धर्मवाद्यांमागे खेचली जाण्याचा धोका आहे असा पेच आज जाणवत आहे. तर समान नागरी कायदा आजच लागू झाला पाहिजे असे न म्हणता एकीकडे कुटुंबविषयक धर्मनिरपेक्ष कायद्यांची गरज आहे असा सतत प्रचार करत राहिले पाहिजे आणि त्याच्या अनुषंगाने आजच्या कायद्यांमध्ये क्रमश: बदल मागत राहिले पाहिजे अशी भूमिका पुरोगामी शक्ती घेत आल्या आहेत.

त्यामुळे आज पुरोगामी कार्यकर्त्यांसकट सर्वांनी या प्रश्नांचा तपशीलवार व खोलवर विचार करणे आवश्यक आहे. "समान नागरी कायद्याच्या" प्रश्नात जे अनेक महत्वाचे मुद्दे गुंतलेले आहेत त्यापैकी काही असे आहेत:

हिंदू कुटुंब - कायद्यात ज्या काही सुधारणा झाल्या आहेत त्या करतांना देखील कोणत्या अडचणी निर्माण झाल्या होत्या व हिंदू पुराणमतवाद्यांनी तेंव्हा काय भूमिका घेतली होती? भारतातील कुटुंबविषयक कायद्यांतील आजवरच्या सुधारणांचा मागोवा घेतल्यास या प्रश्नाची कशी गुंतागुंत झालेली दिसते ? धर्माधिष्ठीत पारंपारिक कायद्यात बदल करून ते सर्व नागरिकांना समान करण्यामागील मुख्य हेतू कोणता ? धर्मविरोधी जीवनाचा प्रचार करावा अशी यामागची भूमिका आहे काय ? मुळात इतर धर्मीयांचे सध्याचे वैयक्तिक कायदे हा हिंदूवरील घोर अन्याय आहे काय ?

धर्मनिरपेक्ष कुटुंब कायद्याला फक्त मुसलमानांचाच विरोध आहे किंवा होण्याची शक्यता आहे हे खरे आहे काय ? विविध धर्मीयांसाठी आज अस्तित्वात असलेले, मुख्यत: विवाह, घटस्फोट, पोटगी, दत्तक, पालकत्व, मालमत्ता व वारसा इत्यादीविषयक कायदे कोणते आणि त्यात कोणते बदल आवश्यक आहेत ? धर्मनिरपेक्ष कुटुंब - कायदा हा ऐच्छिक असावा की सर्वांना बंधनकारक असावा ? त्याची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करता येईल की आजच एकदम पूर्णपणे ती केली पाहिजे ? इतर सर्व नागरी कायदे समान असूनही जर अद्याप राष्ट्रीय एकात्मता साधत नसेल तर "समान नागरी कायदा" (धर्मनिरपेक्ष कुटुंब-कायदा) केल्याने ती

साधता येईल असे मानण्याला काही आधार आहे काय ? सर्वांना समान धर्मनिरपेक्ष कुटुंब कायदा आवश्यक आहे असे म्हणत असताना धर्मवादी–मग तो कोणत्याही धर्मातील असोत–शक्तींची त्याविषयीची भूमिका आणि धर्मनिरपेक्ष – समतावादी शक्तींची भूमिका यात फरक आहे तो कोणता ?

अशा अनेकविध प्रश्नांचा उहापोह करण्याकरता अकादमीतर्फे एक चर्चाशिबिर भरवत आहोत. हे चर्चाशिबिर गुरुवार, दिनांक ६ मे (बुध्दपौर्णिमा सुट्टी) रोजी पुण्यामध्ये होईल व ते पूर्ण एक दिवसाचे असेल. चर्चा शिबिरातील विषय व वक्ते पुढीलप्रमाणे असतील:

१) कुटुंबविषयक कायद्यांतील सुधारणा : ऐतिहासिक मागोवा – प्राचार्य सत्यरंजन साठे

२) विविध धर्मीयांचे आजचे कुटुंब – कायदे आणि अपेक्षित बदल – १ : विवाह, घटस्फोट, पालकत्व — डॉ. जया सागडे

३) विविध धर्मीयांचे आजचे कुटुंबकायदे आणि अपेक्षित बदल – २ : मालमत्ता व वारसाहक्क — प्रा. वैजयंती जोशी

४) समारोप : "समाननागरी कायदा" आणि परिवर्तनवादी राजकारण — कॉ. गोविंद पानसरे

(मांडणीनंतर प्रश्नोत्तरांसाठी वेळ ठेवला जाईल )

धर्मवाद्यांचा अपप्रचार उघडून लावायचा असेल आणि धर्मनिरपेक्ष पर्यायी दृष्टी लोकांसमोर ठेवायची असेल तर सर्व सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी या प्रश्नावर सज्जड वैचारिक तयारी करणे आवश्यक आहे. या चर्चाशिबिराला आपण न चुकता अगदी आवर्जून उपस्थित रहावे अशी आग्रहाची विनंती आहे. आपण निश्चितपणे येत असल्याचे लेखी कळवल्यानंतरच कार्यक्रमपत्रिका व चर्चेची पार्श्वभूमी विशद करणारे टिपण आपल्याकडे पाठवले जाईल. इतर सर्व व्यवस्थेच्या दृष्टीनेही आपण येत असल्याची पूर्वसूचना आम्हाला मिळणे अत्यावश्यक आहे.

आपल्या परिचयातील आणखी ज्या कार्यकर्त्यांना या कार्यक्रमात सहभागी करून घ्यावेसे वाटते त्यांची नांवे (पत्त्यांसह) कळवावीत.

प्रवासखर्च ज्याचा त्याने करावा आणि पुण्यातील निमंत्रितांनी नोंदणी फी रु. १५/– भरावी अशी विनंती आहे.

आपण येत असल्याचे २० एप्रिल च्या आत कळवावे.

आपले,

सुधीर बेडेकर.    रा. प. नेने.    दत्ता देसाई.